MHKO100008992018

**नियमित दिवाणी दावा क्र. १८३/२०१८ निशाणी क्र. ४६ वरील आदेश**

**१.** प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता याचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे.

**२.** अर्ज व त्यावर दाखल केलेले म्हणणे वाचले. उभयपक्षाच्या विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकले. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी मयत असल्याचा अहवाल आल्याने तशी दुरुस्ती दावेत केली आहे व त्यांना नोटीसा व समन्स पाठविले असता काही प्रतिवादी वारसांची नावे चुक असल्याचा अहवाल आला आहे. त्यामुळे संबंधित प्रतिवादी यांना नोटीसा व समन्स गैरलागू झाले आहे. सबब वादी यांनी त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती मागीतली आहे. सदरची दुरुस्ती ही प्रतिवादीची नावे चुकीची असल्याचा बेलीफ अहवाल असल्यामुळे मागावी लागत आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे प्रतिवादीवर अन्याय होणार नाही. सबब अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जातील संपूर्ण मजुकर चुकीचा असून प्रतिवादी यांना तो मान्य नाही. वादी हे सदर दुरुस्तीच्या अनुषंगाने दाव्याचे स्वरुप बदलू पाहत आहेत. सबब सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केली आहे.

**५.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापनासाठी, वाटपासाठी व कायम मनाई ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा दावा वाटपासाठी दाखल केला असल्यामुळे दाव्यात प्रत्येक पक्षकार आवश्यक पक्षकार म्हणून सामील असणे गरजेचे आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची दिसते. सदरच्या दुरुस्ती केल्यामुळे मुळ कथनात बदल होणार नाही कारण कायद्याच्या स्थापित सिध्दातांप्रमाणे वादीला आपली केस स्वतःहून सिध्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तावित दावा दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे, म्हणून मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** वादी यांनी दाव्यामध्ये अर्जाचे अनुषंगाने १४ दिवसांचे आत प्रस्तावित दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत दाखल करावी.

**३.** खर्चाबाबत आदेश नाही.

ठिकाणः- गडहिंग्लज
दिनांक - ०४/१२/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज